रविवार दि.२५ ऑगस्ट२०२४

किंमत २ रुपये | महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०१ अंक : ३५६

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे








Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com


## शरद पवारांनीच जाती-जातीत विष कालवले

# राष्ट्रवादीच्या जन्मापासून फोडाफोडीचे राजकारण सुरू, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा आरोप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या जन्मापासूनच राज्यात फोडाफोडीचे व जातीयवादाचे राजकारण सुरू झाले. त्यांनीच जातीपातींत विष कालवण्याचे काम सुरू केले, असा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी केला. ते नागपूरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. राज ठाकरे यांनी शनिवारी येथील रवीभवन येथे मनसे पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी विद्यमान सरकार व महाविकास आघाडीवर विशेषतः शरद पवार यांच्यावर अत्यंत तिखट टीका केली. राज ठाकरे म्हणाले की, राज्यात फोडाफोडीचे राजकारण शरद पवार यांनी सुरू केले. पुलोदच्या स्थापनेपासून हा प्रकार सुरू झाला. त्यांनी गणेश नाईक, नारायण राणे, छगन भुजबळ असे अनेक नेते फोडले. त्यानंतर जातीचे विषही त्यांनीच कालवले. १९९९ मध्ये राष्ट्रवादीचा जन्म झाला. त्यावेळचा महाराष्ट्र पाहिला तर राष्ट्रवादीच्या जन्मापूर्वी महाराष्ट्रात केव्हाच महापुरुष व संतांची जातीपातींत विभागणी झाली नव्हती. पण १९९९ नंतर असे घडण्यास सुरुवात झाली.राज ठाकरे म्हणाले, मागच्या ५ वर्षांत राज्यात ज्या प्रकारचा राजकीय खेळ झाला, त्याला लोक कंटाळलेत. लोकसभेला ४०० पारची घोषणा आणि संविधान बदलण्याच्या घोषणेमुळे मुस्लीम व दलित समाजाने एकगठ्ठा मतदान केले. हे मतदान अँटी मोदी व अँटी शहा असे होते. ते काही उद्धव ठाकरे, शरद पवारांसाठी मतदान नव्हते. ती वाफ आता निघून गेली आहे. त्यामुळे विधानसभेला गोष्ट वेगळी आहे. कारण ५ वर्षांपूर्वी मतदारांबरोबर जी प्रतारणा झाली, ते लोक विसरलेले नाहीत. या गोष्टीचा राग विधानसभेच्या निवडणुकीला नक्की काढतील. हे मला दौऱ्याच्या माध्यमातून दिसत आहे.



सध्या महाराष्ट्राच्या राजकारणाचा चिखल झाला आहे. येथील मतदारांनी मागील ५० वर्षांत असा चिखल केव्हाच पाहिला नव्हता. मतदार ही गोष्ट केव्हाच विसरणार नाहीत. या गोष्टींचा राग ते आगामी विधानसभा निवडणुकीत निश्चितच काढतील, असे ते म्हणाले.राज ठाकरे यांनी यावेळी बदलापूरच्या घटनेवरूनही सरकार व विरोधकांवर निशाणा साधला. ते म्हणाले, बदलापूरची घटना आमच्या कार्यकर्त्यांनी समोर आणली. या घटनेनंतर अशा घटनांची अक्षरशः फटाक्यांची माळ लागली. ही माध्यमांसाठी दररोजची एक बातमी असायला हवी होती. गत काही वर्षांत सरकारने महिला सुरक्षेशी संबंधित अनेक योजना आणल्या. कोट्यवधी रुपये खर्च केले. पण त्यानंतरही महिलांशी संबंधित अत्याचाराच्या घटनांत घट झाली नाही. ही सत्ताधारी व विरोधक यांच्यासाठीही शरमेची गोष्ट आहे. या घटनांमुळे देशातील प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्राची तुलना उत्तर प्रदेश व बिहारसोबत केली जात आहे.राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्र किंवा देशात नवा गृहमंत्री आला तर त्याला कोणतीही माहिती नसते. याऊलट पोलिसांना सर्वकाही माहिती असतात. त्यामुळे सरकारने पुढाकार घेऊन त्यांना मोकळीक दिली तर गुन्हेगारीचे उच्चाटन होईल. सर्वकाही साफ होईल. एवढी ताकद महाराष्ट्र पोलिसांमध्ये आहे. पण दुर्दैवाने आतापर्यंतच्या कोणत्याही सरकारने त्यांना अशी मोकळीक दिली नाही.पत्रकारांनी यावेळी राज ठाकरे यांना शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्याविरोधात उमेदवार देणार का? असा प्रश्न केला. त्यावर राज ठाकरे म्हणाले की, वरळी विधानसभेत आमची ३७ ते ३८ हजार मते आहेत. मागच्यावेळी आम्ही निवडणूक लढवली नाही. पण यावेळी आम्ही तिथे उमेदवार देणार आहोत. महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी मनसे आपले उमेदवार देईल. त्यानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याही विरोधात उमेदवार दिले जातील.सध्या महाराष्ट्रातील किती जागा लढवायच्या याविषयी पक्षीय पातळीवर सर्व्हे सुरू आहे. २००९ मध्ये साली आम्ही २२५ जागांवर निवडणूक लढविली होती. यावेळीही किमान तेवढ्याच जागांवर उमेदवार देण्याचा आमचा प्रयत्न आहे.




# दौंड तालुक्यातील वारकरी भाविकांच्या सोयीसाठी श्री क्षेत्र पंढरपूर येथे वारकरी भवन उभारणार-आ.राहुल कुल

## रोटी घाटात श्री.सद्गुरू नारायण महाराजांचे स्मारक होणार







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

श्रावणमास निमित्त कै.सुभाष आण्णा कुल मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित भव्य भजन स्पर्धेचा बक्षीस वितरण,सन्मान सोहळा व कीर्तन महोत्सव सांगता समारंभ आज यवत येथे पार पडला.संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज ह.भ.प श्री गुरु पुंडलिक महाराज देहूकर यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन झाले.

जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची पालखी आपल्या तालुक्यातून जात असून,आपल्या दौंड तालुक्याला देखील मोठा सांप्रदायिक वारसा लाभला आहे.त्यामुळे तालुक्यातील गायक,वादक, भजनी मंडळांना व्यासपीठ मिळावे या हेतूने आपण या स्पर्धा व कीर्तन महोत्सव भरविला आहे. तालुक्यातील २५० हून अधिक मंदिराच्या समोर सभामंडप बांधकाम जीर्णोद्धार,मंदिरांसाठी पर्यटन व तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत निधी, मंदिरांना तीर्थक्षेत्र दर्जा मिळवून देणे यासाठी मी नेहमीच पुढाकार घेतला आहे.आपल्या तालुक्याच्या सीमेवर असलेल्या पांडवकालीन भुलेश्वर मंदिराला वन पर्यटन मधुन निधी मिळवून देण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. श्री क्षेत्र पंढरपूर येथे आपल्या तालुक्याचे वारकरी भवन नसून भाविकांच्या सोयीसाठी श्री क्षेत्र पंढरपूर येथे वारकरी भवन उभारणार असल्याचा तसेच ह.भ.प श्री गुरु पुंडलिक महाराज देहूकर यांनी मागणी केल्याप्रमाणे रोटी घाटात श्री.सद्गुरू नारायण महाराजांचे स्मारक उभारणार असल्याचा विश्वास यावेळी उपस्थित सर्वांना आमदार राहुल कुल यांनी दिला.

यावेळी माजी आमदार श्रीम.रंजनाताई कुल,ह.भ.प.गुरुवर्य सुदाम गोरखे गुरुजी,ह.भ.प.सुमंत महाराज हंबीर,ह.भ.प.सुरेश महाराज साठे,ह.भ.प.गुलाब महाराज लवंगे,ह.भ.प. नाना महाराज दोरगे, ह. भ. प.सोळसकर महाराज,ह.भ. प.दिपक महाराज मोटे,आणि कांचनताई कुल यांच्यासह तालुक्यातील सर्व कीर्तनकार,मृदंगमनी, गायक,पेटीमास्तर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेत एकूण ८० भजनी मंडळानी सहभाग घेताला असून त्यातील विजेते पुढील प्रमाणे – प्रथम क्रमांक – श्री.विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ, स्वामी चिंचोली,द्वितीय क्रमांक – श्री. राजेश्वर भजनी मंडळ,राजेगाव तृतीय क्रमांक–श्री.सावतामाळी भजनी मंडळ ,नानगाव उत्तेजनार्थ परितोषिक–श्री.विठ्ठल वारकरी शिक्षण संस्था,डाळिंब, स्वरांगण भजनी मंडळ,गोपाळवाडी, बोराटेवस्ती भजनी मंडळ, नांदुर,श्रीराम भजनी मंडळ,केडगाव विभागीय विजेते –श्री.विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ, कामठवाडी,भैरवनाथ भजनी मंडळ, खडकी,नागेश्वर भजनी मंडळ ,पाटस संत यादव बाबा भजनी मंडळ,वडगाव बांडे विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ,खोर यादववाडी भजनी मंडळ,खामगाव विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ,पारगाव

# प्रा.डॉ.गोपाल बच्छिरे हे नाव आंदोलक तथा नवनवीन उपक्रमाचे विद्यापीठ



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

गोपाल बच्छिरे हे नाव लोणार-मेहकर विधानसभेसाठी नवीन नाही. बच्छिरे यांचा परिवाराला समाजसेवेचा वारसा लाभला आहे. त्यांचे मोठे बंधू बालचंद्र भिकाजी बच्छिरे हे .लोणारचे सरपंच होते, तर पुढे नगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर त्यांचे मोठे भाऊ नगरसेवक व पुढे सभापती होते.

गोपाल बच्छिरे यांचे प्राथमिक शिक्षण हे लोणारच्या जिल्हा परिषद शाळेत झाले आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण शिवाजी हायस्कूल, लोणार येथे झाले आहे. शालेय जीवनापासूनच संघटन कौशल्य विकसित झाले होते. बच्छिरे यांनी शालेय जीवनातच आंदोलनाची सुरुवात केली. शिवाजी हायस्कूलमध्ये नव्याने लागू झालेल्या गणवेश (कथ्या रंगाची पॅन्ट आणि पांढरा शर्ट) बाबत विद्यार्थ्यांना आठवड्यातून एक दिवस रंगीत कपडे घालण्याची मुभा मिळावी म्हणून त्यांनी आंदोलन केले. त्या दिवशी एकही विद्यार्थी शाळेत गेला नाही. त्यांच्या या मागणीला तत्कालीन प्राचार्य बैस सर आणि उपप्राचार्य हाडोळे सर यांनी मान्यता दिली, आणि गोपाल बच्छिरे यांचे पहिले आंदोलन यशस्वी झाले. लोणार मध्ये उच्च शिक्षणाची सोय सुविधा नसल्यामुळे ते संभाजीनगरला उच्च शिक्षणासाठी गेले संभाजीनगरला जाऊन, बच्छिरे यांनी बी.ए., एम.ए., एल.एल.बी., नाट्यशास्त्रात पदवी व मास्टर डिग्री, पत्रकारितेत पदवी व मास्टर डिग्री, टुरिझम ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये मास्टर डिग्री, शिक्षणशास्त्रात पदवी, एम.फिल, आणि फिलोसॉफीमध्ये पीएच.डी. अशा १२ पदव्याचे शिक्षण घेतले. चळवळीचा अंग असल्याने त्यांनी विद्यार्थ्यांची चळवळ उभी केली आणि विद्यार्थी सेनेचे शहर उपप्रमुख झाले. १९९६ मध्ये विद्यापीठाची सिनेट निवडणूक लढविली. नंतर पोलिस डिपार्टमेंटमध्ये निवड झाली परंतु पोलिसांची नोकरी नाकारली. पुढे जनसंचार मंत्रालयात सुपरवायझर क्लास टूच्या पोस्टवर नियुक्ती झाली. सहा महिने नोकरी केल्यानंतर प्राध्यापक भरतीच्या जागा निघाल्या आणि तीन ठिकाणी अर्ज करून मुलाखती दिल्या. तीनही ठिकाणी निवड झाली आणि त्यांनी सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद निवडले. लेक्चरर म्हणून १७ सप्टेंबर १९९६ ला ते रुजू झाले.

सन २००० मध्ये त्यांनी संत रविदास शिक्षण संस्थेची स्थापना केली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सक्रिय सदस्य झाले. त्यांची भाषणशैली आणि संघटन कौशल्य बघून तत्कालीन राष्ट्रवादीचे नेते आर.आर. आबा आणि प्रदेशाध्यक्ष बबनराव पाचपुते यांनी २००५ मध्ये प्रदेश सचिव या पदावर त्यांची नियुक्ती केली. त्यानंतर बच्छिरे यांच्या संस्थेला कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय दाभाडी येथे पहिले महाविद्यालय मंजूर झाले. सुप्रियाताई सुळे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड सायन्स हे संभाजीनगर येथे दुसरे महाविद्यालय २००८ मध्ये मिळाले, त्यामुळे बच्छिरे शिक्षण महर्षी झाले.

शैक्षणिक कार्य करत असतानाच त्यांनी सामाजिक कार्यातही रस घेतला. सन २००० पासून राष्ट्रीय चर्मकार महासंघ या सामाजिक संघटनेशी जुळले. सुरुवातीला औरंगाबाद शहर सहसचिव, नंतर २००९ मध्ये जिल्हाप्रमुख, २०१५ मध्ये मराठवाडा प्रदेशाध्यक्ष व कोअर कमिटी सदस्य, आणि २०२२ मध्ये राष्ट्रीय प्रवक्ता म्हणून जबाबदारी स्वीकारली.

संशोधनाचा छंद असल्यामुळे त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे व परिषदांमध्ये ८४ संशोधन पेपर सादर केले. त्यापैकी ४५ संशोधन पेपर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मॅगझिनमध्ये प्रकाशित झाले. ते पीएच.डी. गाईड आहेत आणि २२ विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी.चे संशोधन करत आहेत.गोपाल बच्छिरे यांनी नॉलेज अँड रिसर्च, रविदास राज, इतिहास संशोधन पत्रिका, आणि शोधांकन यांसारख्या मॅगझिन्सचे संपादन केले आहे.ते महाराष्ट्र शासनाच्या ग्राहक संरक्षण परिषदेवर पंधरा वर्षांपासून कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांवर ते कार्यरत असून, अकॅडमिक कौन्सिल मेंबर, बोर्ड ऑफ स्टडीज मेंबर, आणि परीक्षा विभागात होणाऱ्या गैरवर्तनांवर निर्णय घेणाऱ्या न्याय मंडळाचे न्यायधीश म्हणून त्यांनी कार्य केले आहे. कोणालाही न घाबरणारे आणि न्याय व हक्कांसाठी सरकारला भिडणारे नेते म्हणून त्यांची ओळख आहे.यशवंतराव चव्हाण नंतर जर महाराष्ट्राला एक गुणवंत शीलवंत व विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवणारा मुख्यमंत्री झाला असेल तर तो ते म्हणजे उद्धव बाळासाहेब ठाकरे त्यांच्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात स्वतः आजारी असताना ज्या पद्धतीने महाराष्ट्र सांभाळला विरोधकांनी मशिदीवरील भोंगे, हनुमान चालीसा च्या माध्यमातून महाराष्ट्रात दंगली भडकवण्याचा अतोनात प्रयत्न केला, परंतु त्यातूनही उद्धव साहेबांनी महाराष्ट्रास सुखरूप बाहेर काढले, कोरोनाच्या काळात महाराष्ट्र वाचवला जगवला म्हणून उद्धव साहेब गोपाल बच्छिरे चे आयकॉन झाले. मुख्यमंत्री असावा तर असा शिवसेनेत झालेल्या फुटी नंतर उद्धव साहेबांचे खंदे समर्थक संजय राऊत साहेब यांना अकारण कोठडीत डामले उद्धव साहेब एकटे पडल्यासारखे झाले आणि म्हणून २१ वर्षाचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सिनियरिटी दावावर लावून आपल्या प्रदेश सरचिटणीस पदाचा रीतसर राजीनामा देऊन उद्धव साहेबांची भेटीची वेळ घेटली, ०४ सप्टेंबर २०२२ दुपारी एक ते दोन भेटीची वेळ ठरली गोपाल बच्चे आपल्या अडीचशे समर्थकांसह मातोश्रीवर धडकले उद्धव साहेबांशी यथोचित चर्चा करून उद्धव साहेबांच्या हस्ते शिवबंधन बांधले उद्धव साहेबांनी मेहकर विधानसभा बांधणीची जबाबदारी गोपाल बछिरे यांच्यावर टाकली ५ सप्टेंबर २०२२ ते आज पर्यंत त्यांनी मागे वळून पाहिले नाही लोणारी ची पवित्र धार तीर्थाचे स्नान बंदी उठवण्यासाठी केलेल्या आंदोलनास प्रथम यश मिळाले त्यानंतर शेतकरी, कष्टकरी, तरुण बेरोजगार, महिलांचे प्रश्न, दुष्काळीचा निधी, अतिवृष्टीचा निधी, गारपिटीचा मदत, पीक विमा, श्रावणबाळ योजना, प्रधानमंत्री आवास योजना, महावितरण वीज कंपनी, लोणार नगरपालिकेतील सावळा गोंधळ, महिलांवरील अत्याचार याविषयी आंदोलने केली त्यात धरणे, निदर्शने, मोर्चे, सविनय कायदेभंग, उपोषणे, आत्मदहन सारखे ६३ आंदोलने करून त्यांच्या प्रत्येक आंदोलनाची दखल वृत्तपत्रांनी घेतली त्या कारणाने मेहकर लोणार विधानसभा क्षेत्रात शहरापासून गाव, वस्ती, वाडी, चावडीच्या च्या शेवटच्या सामान्य माणसापर्यंत गोपाल बच्छिरे हे नाव, एक आंदोलक व सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणारा म्हणून पोहोचले.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांनी, गोपाल बछिरे यांच संघटन कौशल्य, निर्भीड धाडसी प्रवृत्ती, निष्ठावंत एकनिष्ठ शिवसैनिक, एक वर्षाच्या कामाची पावती म्हणून सप्टेंबर २०२३ मध्ये घाटावरील ६ तालुक्याचा जिल्हा संघटक व दोन वर्षाचे काम पाहून ऑगस्ट २०२४ मध्ये संपूर्ण बुलढाणा जिल्हा म्हणजे १३ तालुक्याचा जिल्हा संघटक म्हणून नियुक्ती देण्यात आली. शालेय जीवनात एका मित्राला साप चावल्यानंतर बच्छिरे यांनी त्या विषारी सापाचा चावा स्वतःच्या पायावर घेतला आणि मित्राचे प्राण वाचवले. त्यानंतर त्यांनी त्या विषारी नागाला ठेचून मारले. आता २०२४ च्या विधानसभेत त्यांनी जनतेच्या आशीर्वादाने विकास विरोधक अजगराला धडा शिकवण्याचा निर्धार केला आहे.

**प्रा. गजानन जाधव**
**सरदार वल्लभाई पटेल उच्च माध्यमिक विद्यालय हिरडव**

# सामाजिक समतेसाठी सृजनाविष्काराचा आज जयघोष-प्रा.वा. ना.आंधळे ,गणेश खाडे

## अहिल्यानगरात राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचा २५ ऑगस्ट२४ रोजी दणदणीत शुभारंभ


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

मानवी आयुष्याला जगणं भरभरून देणाऱ्या साहित्य आणि समाज या दोन्ही घटकांना मानवंदना देण्यासाठी महाराष्ट्रभरातून दि.२५ ऑगस्ट २०२४ रोजी अहिल्यानगरात साहित्यिकांची मांदियाळी येतेय.सदर संमेलनातून सामाजिक समता हा विषय केन्द्रस्थानी राहणार असून उदघाटन सोहळ्यासोबत ग्रंथदिंडी, परिसंवाद, कथाकथन, कविसंमेलन, पुरस्कार वितरण असे दिवसभराच्या भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन व सुसूत्र नियोजन निश्चितच भारावणारे असणार आहे. अहिल्यानगर शहरातील निर्मलनगर परिसरात संत भगवानबाबा चौकात गंगा लॉन्सवर दि२५ ऑगस्ट२०२४ रोजी सकाळी ९वाजेपासून सायंकाळी ६वाजेपर्यंत सदर संमेलन संपन्न होत असल्याचे महासंघाचे अध्यक्ष गणेश खाडे यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलतांना सांगितले.

संमेलनाच्या अध्यक्षा नांदेड येथील सुप्रसिद्ध साहित्यिका तथा समीक्षका मा.प्रा.डॉ.सौ.संगीताताई घुगे व उदघाटक डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा. प्रा.डॉ.गजाननराव सानप यांचे सह प्रमुख मान्यवर म्हणून नगरचे पालक मंत्री मा.राधाकृष्ण विखे पाटील, खासदार मा. निलेश लंके,।माजी खासदार मा. सुजय विखे पाटील,।आमदार मा. संग्राम जगताप, शिर्डीचे खासदार मा. भाऊसाहेब वाघचौरे, माजी खासदार मा. सदाशिव लोखंडे, माजी महसूल मंत्री मा. बाळासाहेब थोरात, माजी मंत्री मा. प्राजक्त तनपुरे, आमदार मा. मोनिकाताई राजळे, मा.रोहित पवार, मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ.नवनाथ आघाव, वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुप्रसिद्ध विचारवन्त साहित्यिक मा. गणेशजी खाडे, पहिल्या मराठी साहित्य संमेलनाचे मावळते अध्यक्ष सुप्रसिध्द कवी मा. प्रा.वा.ना.आंधळे तसेच नाशिक येथील सुप्रसिद्ध उद्योजक मा.बुधाजीराव पानसरे या मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती असणार आहे.सदर संमेलन सर्वार्थाने यशदायी व्हावे म्हणून संमेलनाचे स्वागताध्यक्ष विश्वविजेते कुस्ती खेळाडू मा.राजकुमार आघाव पाटील, सह स्वागताध्यक्ष रेणुका वराडे, सह स्वागताध्यक्ष घनश्याम बोडके, निमंत्रक जिल्हाध्यक्ष मल्हारी खेडकर, युवा जिल्हाध्यक्ष अर्जुन वायभासे प्रयत्नांची सरशी करीत आहेत.





# साहित्य सोनियाच्या खाणी...!

## अहिल्यानगरात आज साहित्यिकांची मांदियाळी

साहित्य म्हणजेवाङ्मय समाजाचा आरसा असते! आत्तापर्यंत जगात अनेक क्रांती घडून आल्या आहेत, त्या केवळ शस्त्रांनीच नाही तर शास्त्रांनी म्हणजेच लेखनींनी सुद्धा घडून आल्या आहेत. जगाचा इतिहास मोठा प्रवाही आणि प्रभावी आहे. त्यात लेखणीचे, ज्ञानाचे काम महत्वपूर्ण आहे. इसविसनपूर्व काळातील पुरुषोत्तम तत्वज्ञ श्री कृष्ण-तथागत गौतम बुद्ध-सॉक्रेटिस-विविध कोरीव लेणीपासून ते आजतागायत हे सर्व अजरामर आहे ते केवळ आणि केवळ अक्षरांच्या माध्यमातून! विश्वात केवळ अक्षरेच जिवंत आहेत आणि त्या आधारे अनंत माणसांचा सर्वार्थाने उद्धार झाला आहे. श्रीमंत, शक्तिशाली, समृद्ध, महाल, किल्ले, लेणी, नाणी इत्यादी उभी करणारी माणसे आणि वास्तू कालौघात नामशेष झाल्या आहेत, मात्र त्या त्या कालखंडातील अक्षर-लेखन मात्र अजूनही जगाला पथदर्शी होत आहे. आजच्या घडामोडी उद्याचा इतिहास असतो, परंतु वाङ्मयाचे तसे मुळीच नसते. ते रोजच नित्य नूतन आणि नवनवोन्मेष शालिनी प्रभा, सूर्यासारखे देदीप्यमान असते. वाङ्मय कधीच शिळे अथवा जुने होत नाही; उलट त्यामुळेच आपल्या जीवनाला नवता प्राप्त होते. आद्यकवी रामायणरचिता वाल्या कोळी असो की डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम, आजही ते तेवढ्याच ताकदीने आपल्यासोबत आहेत. माणसांकडे सर्व सुविधा असतांना त्याला सुमधुर संगीताचे दोन बोल किंवा आईचे प्रमाचे दोन शब्द कानावर पडताच सर्वांग तृप्त होते आणि क्षणार्धात निद्रेला स्वाधीन होतो. शब्दांची शक्ती गहन आणि महान आहे. त्यांना देश, प्रदेश, जात, धर्म, पंथ, लिंग, गरीब, श्रीमंत इत्यादी भौतिक बाबींचे बंधन नसते. सूर्यप्रकाश, वारा, सुगंधासारखे शब्द संपूर्ण विश्वात मुक्त विहार करत असतात. याच न्यायाने माणसाने हे अनमोल शब्दरत्ने हृदयात जपण्याचे महत्कार्य केले आहे. प्रतिभा कुणालाही लाभत नसते. चक्रधर, महदंबा, जनाई, नामदेव, ज्ञानदेव, मुक्ताई, सावतोबा, चोखोबा, एकोबा, तुकोबा सारखी शब्दरत्ने कधीतरी प्रकट होत असतात. हा अनमोल ठेवा जपणे आणि त्यांचा सतत गौरव होणे हे क्रमप्राप्त असते, याच न्यायाने माणसाने शब्द आणि शब्द निर्मात्यांचे सोहळे, उत्सव करायचे ठरवले आणि त्यातूनच साहित्य संमेलन संकल्पना उदयास आली.



प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८




आज जगभर साहित्यिकांचे सोहळे संपन्न होत आहेत. महाराष्ट्रात साहित्य संमेलनाची परंपरा फार जुनी आहे. अलीकडच्या काळात विविध क्षेत्रातील साहित्यिक मंडळींची साहित्य संमेलने होत आहेत. दरवर्षी हजारो ग्रंथ प्रकाशित होत असून लाखो ग्रंथांची विक्री होत आहे. याच अनुषंगाने मागील तीन वर्षांपासून वंजारी महासंघ, महाराष्ट्र साहित्य आघाडी वंजारी समाजाचे दुसरे एकदिवशीय राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन घेत आहे. यावर्षीचे दुसरे मराठी साहित्य संमेलन अहिल्यानगर(अहमदनगर) येथे आज दिनांक २५ ऑगस्ट रविवार रोजी संपन्न होत आहेत. अहिल्यानगरचे आमदार मा.श्री संग्रामभैय्या जगताप यांच्या शुभहस्ते आणि मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील, मा.आ.किशोर दराडे, मा.शिवाजीराव गर्जे, मा.शिवाजीराव कर्डिले, उद्योजक मा.श्री बुधाजीराव पानसरे, वंजारी महासंघ, संस्थापक अध्यक्ष श्री गणेश खाडे, श्री प्रतापकाका ढाकणे, श्री रामदास आंधळे, प्राचार्य डॉ.नवनाथ आघाव, आनंद लहामगे, सुधीर पोटे, युवराज ढाकणे, निमंत्रक मा.श्री मल्हारी खेडकर आदि मान्यवरांच्या उपस्थितीत या संमेलनाचे उदघाटन संपन्न होणार आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष जागतिक कुस्ती विजेता श्री राजकुमार आघाव, श्री घनश्याम बोडखे, सौ.रेणुकाताई वराडे-सानप, श्री अर्जुन वायभासे इत्यादी मंडळी मागील दोन महिन्यांपासून तयारी करत आहेत. दुसऱ्या वंजारी समाजाच्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवयित्री तथा समीक्षक सौ.संगीता घुगे असून या प्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजी नगरचे राज्यपाल

एकूण पाच सत्रात संपन्न होणाऱ्या साहित्य संमेलनातदुपारी १ ते २.३० वेळात परिसंवादाचेआयोजन केले असून त्यामध्येसुसंकृत समाज, वंजारी समाजाचे राष्ट्र निर्माणातील योगदान आणि सामाजिक समता काळाचीगरज या महत्वपूर्ण विषयावर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, कवी, व्याख्याते सर्वश्री प्रा.डॉ.शिवाजी हुसे, प्रा.डॉ.रामकिसन दहिफळे (छ.संभाजी नगर), श्रीमती रेखा शेळके-संख्ये(मुंबई), श्रीमती प्रीती बेटकर(पुणे) आणि ह.भ.प.प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये(परभणी) आदि मान्यवर आपले विचार व्यक्त करणार असून प्रा.डॉ.शिवाजी नागरे अध्यक्षस्थान भूषवतील. भोजनावकाशानंतरदुपारी ३.३० ते ५.३० दरम्यान कथाकथनसत्र श्री तुळसीराम बोबडे(अकोला) यांच्या अध्यक्षतेखाली होत असून सौ.अलकनंदा आंधळे-घुगे, प्रा.सुवर्णा कराड, सौ.रंजना सानप, नीता सानप-घुले आदि कथाकार आपल्या कथा सादर करतील. त्यानंतर५.३० ते ७.००काळात मा.प्रा.मनोहर आंधळे यांच्या अध्यक्षतेखालीकविसंमेलनहोत असून यात श्री चंद्रकांत धस, श्री रमेश आव्हाड, सौ.विद्या लटपटे, सौ.छाया जायभाये-वाघ, सौ.सविता ढाकणे, सौ.जयश्री वाघ, सौ.द्वारका मुंडे-गित्ते, सौ.अलका सानप, श्री जयदीप विघ्ने आदि मान्यवर कवी-कवयित्री आपल्या कविता सादर करतील. संमेलनाच्यापाचव्या समारोपीय सत्रात रात्री ७ ते ८.०० वेळातवंजारी समाजातील मान्यवर लेखक, कवी, संपादक, पत्रकार आदि मान्यवर मंडळींचेसंत भगवानबाबा साहित्यरत्न, संत भगवानबाबा समाज प्रबोधन, महाराष्ट्रभूषण आदि पुरस्कारदेऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. दिवसभर चालणाऱ्या विचार मंथन-चिंतन सोहळ्यास महाराष्ट्रातील तमाम साहित्य रसिकांनी उपस्थित राहण्याचे कळकळीचे आवाहन वंजारी महासंघ, महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष, लेखक, विचारवंत, साहित्यिक तथा अध्यात्मिक मार्गदर्शक श्री गणेश खाडे तथा वंजारी महासंघ संपूर्ण साहित्यिक आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्रातील मुलींच्या अत्याचारा विरोधात महाविकास आघाडीचे दौंड मध्ये निषेध आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

महाराष्ट्रातील महिला आणि मुलींच्या अत्याचाराच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलनाची धग दौंड शहरातील संविधान चौकामध्ये व्यक्त झाली.महाविकास आघाडीच्या वतीने मूक निदर्शने, करण्यात आली.आंदोलकांनी तोंडावर काळी पट्टी बांधून निषेध व्यक्त केला.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख शरदचंद्र सूर्यवंशी,राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष आप्पासाहेब पवार, उपजिल्हाप्रमुख अनिल सोनवणे,शंकरराव शितोळे,शिवसेना महीला आघाडी जिल्हा संघटक ज्योती गाडे,युवकचे सचिन काळभोर,युवासेनेचे अनिकेत चौधरी,किरण वाळुंजकर,शहर प्रमुख आनंद पळसे,दिपक पारदासांनी प्रकाश सोनवणे,सुधीर शितोळे, हरेश ओझा, सचिन गायकवाड,योगिनी दिवेकर,योगिता रसाळ,मनीषा सोनवणे,अश्विनी मोरे,नामदेव राहिंज,चैतन्य पाटोळे,आदी महाविकास आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित मोठ्या संख्येने होते.




## पुला अभावी चारठाणकर जनतेचे हाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चारठाणा । श्रीपाद जोशी**

चारठाणा गावाच्या कसबा व पेठ भागाच्या अगदी मध्यभागी गोदरी नदी असून शनिवारी चारठाणा गावामध्ये व परिसरात शनिवारी मुसळधार पाऊस झाला दरम्यान पाऊस पडल्यानंतर गोदरी नदीला खूप मोठा पूर आला आणि दोन्ही गावाला जोडणारा रस्ता खंडित झाला होता.

दरम्यान हे हाल स्वातंत्र्यापासून गाव भोगत आहे यावर आजपर्यंत जनतेच्या मागणीची कुठल्याही लोकप्रतिनिधींनी उपाययोजना करण्याचा विचार सुद्धा केला नाही मागच्या अनेक वर्षापासून सदर नदीवर कमी उंचीचा पुल असून त्याला पूर आला की त्यावरून येणारी जाणारी लहान शाळकरी मुले तसेच हॉस्पिटल ला जाणारी एखादी व्यक्ती त्यांना असा पूर आल्यावर अडकून पडावे लागते अशी परिस्थिती असून सदर नदीवर मोठा पुल करावा याबाबत अनेकवेळा गावकर्यांनी लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे पाठपुरावा केला परंतु यावर कोणीही लोकतिनिधी विचार करीत नसल्याने ही परिस्थिती निर्माण झालेली आहे.एकंदरीत याबाबत प्रशासनाने लक्ष घालून सदर नदीवरील पुलाचा असा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी जनतेकडून होत आहे.



## नांदेड येथे बुथ कार्य योजना अंतर्गत नांदेड ,परभणी, हिंगोली जिल्ह्यातील संयोजक विस्तार जिल्हा अध्यक्ष यांची बैठक संपन्न





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

नांदेड येथे दिनांक २३ ऑगस्ट रोजी बुथ कार्य योजना अंतर्गत नांदेड,परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील संयोजक,विस्तारक आणि जिल्हाध्यक्ष याची बैठक प्रदेश संयोजक मा खा डॉ भागवत कराड याचा उपस्थित संपन्न झाली. या वेळेस उपस्थित विभाग संगठन मंत्री संजय कौडगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मा खा प्रतापराव पाटील चिखलीकर सहसंयोजक प्रवीण साले, हिंगोली बूथ संयोजक रामदास पाटील सुमठाणकर,जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबरडे, जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे, जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख,प्रदेश सचिव देविदास भाऊ राठोड,आ तानाजी मुटकुळे, मा खा शिवाजी माने,मा आ राम पाटील रातोळीकर, मा आ रामराव वडकुते व पदाधिकाऱ्यांसह संयोजक सहसंयोजक विस्तारक उपस्थित होते.

## अखिल भारतीय किसान काँग्रेस कमिटी हिंगोली पदाधिकाऱ्यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

अखिल भारतीय किसान काँग्रेस कमिटी जिल्हा हिंगोली पदाधिकाऱ्याच्या नियुक्ती करण्यात आल्या असून मा ,जिल्हाध्यक्षः एकनाथ अर्जुनराव शिंदे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व हिंगोली विधानसभेचे मा ,आमदार भाऊरावजी पाटील गोरेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय किसान काँग्रेस कमिटी जिल्हा हिंगोली पदाधिकारी याची निवड करण्यात आली जिल्हा उपाध्यक्ष नामदेवराव सखाराम जाधव जिल्हा सचिव गजानन पुजाराव गडदे जिल्हा सहसंचिव बद्रीनाथ संभाजी घोंगडे जिल्हाअध्यक्ष सौशल




मिडीया हिगोली सौरभ विठल तांबिले हिगोली जिल्हा कार्याध्यक्ष पांडुरंग रामकिसन टाले सेनगाव तालुका अध्यक्ष बालासाहेब पंडितराव नाईक उपाध्यक्ष गजानन सुभाषराव गांधिले सेनगाव ता. सचिव जनार्दन अमृता वायचाळ सेनगाव शहराध्यक्ष विठ्ठल दत्तराव अंभोरे हिंगोली तालुका अध्यक्षः फुलाजी जनार्दन शिंदे उपाध्यक्ष : विनोद भगवान शिंदे सचिवः गजानन शंकरराव डांगे

युवा नेते रणजीत पाटील गोरेगावकर गजानन पाटील गोरेगावकर बापूराव पाटील वडतकर दाजीबा पाटील पंडितराव सरनाईक बालाजी गावंडे गोविंदराव उबाळे बबनराव उबाळे नेमान शेख शिवाजी जगताप संतोष जगताप ओम भिसे गंगाधर टाले पाटील रामकृष्ण जाधव रंगनाथ पाटील राजू पाटील कडतीकर विलासराव सरनाईक आकाश उबाळे नितीन उबाळे अक्षय डाखोरो एस व्ही टाले

## सीना प्रकल्पातून मेहकरी धरणात पाण्याला सुरुवात पंधरा दिवसात मेहकरी धरण भरून घेणार-आ.बाळासाहेब आजबे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यातील मेहकरी धरण हे अद्याप पर्यंत कमी पावसामुळे भरलेले नाही पुणे परिसरात झालेल्या पावसामुळे सीना धरणामध्ये कुकडीचे पाणी सोडण्यात आले आहे सीना धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाल्यामुळे सीना धरणातून आज शनिवार २४ ऑगस्ट रोजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या हस्ते बटन दाबून मेहकरी धरणात पाणी सोडण्यात आले येत्या पंधरा दिवसांमध्ये सीना धरणातून मेहकरी धरण भरून घेण्यात येणार आहे असे यावेळी आमदार बाळासाहेब आजबे यांनी सांगितले.

शनिवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी सीना धरण येथे आमदार बाळासाहेब आजबे यांच्या हस्ते सीना धरणातून मेहकरी धरणात पाणी सोडण्यास बटन दाबून प्रारंभ करण्यात आला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे युवा नेते महेश आजबे अर्जुन काकडे, घटनेतील सुभाष वाळके सरपंच केशव आजबे उपविभागीय अधिकारी श्री.रमेश आडे, श्री.घोडेश्वर साहेब, शाखाधिकारी श्री.गावडे साहेब यांच्यासह मान्यवर मंडळी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि शेतकरी बांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदारआजबे म्हणाले की पुणे परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे कुकडी धरण भरले आहेत त्यामुळे कुकडी धरणातून बोसाखिंड मार्गे सिना प्रकल्पामध्ये गेल्या पंधरा दिवसापासून पाणी सोडण्यात आले आहे त्यामुळे सीना धरणनात मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यामुळे सीना धरणातून पुढील काळामध्ये मेहकरी



धरणात पाणी सुरू राहणार आहे सलग पंप हाऊस सुरू राहिल्यास येत्या पंधरा दिवसाच्या आत धरण पूर्णपणे भरेल मेहकरी धरण पूर्णपणे भरल्यास या भागातील शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे सध्या आष्टी तालुक्यामध्ये ही चांगला प्रमाणात पाऊस सुरू आहे सर्व तलाव जवळपास भरले असून मेहकरी व इतर काही तलाव भरण्याचे बाकी आहेत सीना धरणातून व होणाऱ्या पावसाच्या पाण्यातून मेहकरी धरण लवकरच भरेल त्यामुळे पुढील काळात उद्भवणाऱ्या पाण्याच्या समस्या पासून या भागातील शेतकऱ्यांची सुटका होणार आहे मागील वर्ष वगळता दरवर्षी आपण मेहकरी धरण भरून घेतले आहे त्यामुळे आष्टी तालुक्यात पाण्याची टंचाई भासली नाही लवकरच शिंपोरा ते खुंटेफळ ही योजना ही पूर्ण होणार असून येणाऱ्या काळामध्ये दोन्ही योजनांच्या पाण्यामुळे आष्टी तालुका सुजलाम सुफलाम होण्यास मदत होणार आहे असेआमदार बाळासाहेब आजबे काका यांनी यावेळी बोलताना सांगितले या कार्यक्रमासाठी पुडी वाहिरा हातोळण घोंगडेवाडी पारोडी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसरे कृषी प्रदर्शन

# आष्टी येथे दर तासाला भव्य लकी ड्रॉ,शेवटच्या दिवशी, ड्रॉ मधून बंपर बक्षीस, महिलांसाठी खेळ पैठणीचा कार्यक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

बीड व अहमदनगर जिल्ह्यातील लाखों शेतकऱ्यांसाठी खास पर्वणी म्हणून शेतकऱ्यांचे नेते व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसरे कृषी प्रदर्शन आष्टी येथे होणार आहे.चार दिवस चालणाऱ्या कृषी प्रदर्शनामध्ये आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला मोफत भव्य लकी ड्रॉ बक्षीस तर शेवटच्या दिवशी भाग्यवान शेतकरी जोडीसाठी लकी ड्रॉ मधून बंपर बक्षीस मिळणार असुन लाडक्या बहिणींसाठी उद्धव के.पी.प्रस्तूत महाराष्ट्रभर गाजत असलेला महिला भगिनींचा एकमेव आवडता कार्यक्रम खेळ पैठणीचा शुक्रवार दि.३० ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी होणार आहे.यासाठी प्रथम बक्षीस आहे ११ हजार १०१ रूपयांची मानाची पैठणी याशिवाय इतर भरपुर बक्षिसे जिंकण्याची व विविध खेळ खेळण्याची संधी आहे .याबाबत अधिक माहिती अशी की,आष्टी येथील श्री. छत्रपती शाहू-फुले-आंबेडकर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्रीराम आरसुळ,सर्व प्राध्यापक, इतर कर्मचारी वृंद,विद्यार्थी व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी आयोजित चार दिवसीय भव्यदिव्य अशा कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे व लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे,आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे तर समारोप १ सप्टेंबर रोजी अ.भा. वारकरी संप्रदायाचे ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले व गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.सांगली येथील व देशातील सर्वात उंच ४१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार




आहे.गतवर्षी हे प्रदर्शन उशिरा झाले होते. शेतकऱ्यांना प्रदर्शनातून सविस्तर मार्गदर्शन मिळणार आहे.१ लाख २५ हजार शेतकऱ्यांनी गतवर्षी कृषी प्रदर्शनाचा लाभ घेतला होता. कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने चार दिवस दररोज दुपारी १२ ते २ या वेळेत कृषी संबंधित तज्ञांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे.कृषी प्रदर्शनासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला लकी ड्रॉ काढण्यात येईल व लकी शेतकऱ्यांला शेती उपयोगी भेट वस्तू देण्यात येईल. शेवटच्या दिवशी बंपर लकी ड्रॉ काढुन विजेत्याला बक्षीस दिले जाईल.कृषी प्रदर्शनात दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी वेगवेगळे अत्याधुनिक मशिन, कुक्कुटपालन माहिती तसेच बँके मधून लोन कसे काढायचे यांची माहिती मिळणार आहे.गांडूळ खत कसे बनविने मार्गदर्शन, खवय्यांसाठी विदर्भ,कोकण, मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्र या भागातील खाद्यपदार्थ खाण्यासाठी व विक्री साठी स्टॉल उपलब्ध असणार आहे.जिरेनियम शेती, खेकडा पालन, गोमातेच्या शेणापासून विविध वस्तू कशा निर्माण करायच्या यांची माहिती मिळणार आहे.महिलांनी घरबसल्या घरगुती व्यवसाय करणे,विविध प्रकारचे ट्रॅक्टर व अवजारे,शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला,नाटक,शास्त्रीय संगीत, शेतकरी गीते,लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.गतवर्षी एकुण १०० स्टॉल होते यावर्षी १५० स्टॉल राहतील. गेल्या प्रदर्शनात ७ ते ८ कोटी रुपयांची उलाढाल झाली होती यावर्षी हा आकडा वाढणार आहे.हे प्रदर्शन मोफत आहे त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले आहे.

प्रदर्शन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते अजयदादा धोंडे,अभयराजे धोंडे, कृषी महाविद्यालयाचा सर्व स्टाफ, विद्यार्थी तसेच व्यवस्थापक बंडु पाचपुते,गणेश जठार व इतर टीम प्रयत्नशील आहेत.


### सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गलथान कारभारामुळे

# पाच दिवसांपासून सरस्वती पुलावरून वाहतूक पूर्णपणे बंद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

काष्टी ते सिध्दटेक रोडवर पेडगाव येथील सरस्वती नदीवरील पुलाचे काम सुरू असुन बाजूने काढलेला बायपास रस्ता गेल्या पाच दिवसांपुर्वी पावसांच्या पाण्यामुळे वाहुण गेल्याणे गेल्या पाच दिवसांपासून वाहतूक पुर्णपणे बंद झाली आहे सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्रीगोंदा यांच्या दुर्लक्षेमुळे सामान्य नागरिकांना व प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे गेल्या अनेक वर्षांपासून या सरस्वती नदीवरील पूल बांधण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात होती श्रीगोंदा तालुक्याचे लोकप्रतिनिधी यांनी याचा पाठपुरावा करून कामाला मंजूरी मिळाली



परंतु ऐन पावसाळ्याच्या दिवसात संबंधित ठेकेदाराने जुने पुल खोदकाम करून या जागेवर जवळपास पंधरा फुटा चा खड्डा खोदला व बाजूने काढलेल्या बायपासची निवेजन करता आले नाही आणि सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्रीगोंदा यांच्या अधिकाऱ्याने याकडे तर पाठच फिरवल्यामुळे साहेब उघडा डोळे बघा नीट अशी म्हणण्याची वेळ आली आहे मोहीते खराडे वस्ती, काझी वस्ती, हवालदार वस्ती, ओगले नगर, येथील जवळपास पन्नास विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर राहावे लागत आहे तसेच स्थानिक शेतकऱ्यांना आपला जीव मुठीत घेऊन पाण्यातून प्रवास करण्याची वेळ आली आहे या ठिकाणी अनुचित प्रकार घडू नये म्हणून या पुलाच्या बायपासचे नियोजन लवकरात लवकर करणे खूप गरजेचे आहे.

### भिगवण पोलीस अँक्शन मोडवर

# भिगवण पोलीसांकडून अल्पवयीन दुचाकी चालकांवर कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

भिगवण (ता.इंदापूर) मध्ये शांतता व सुव्यवस्था कायम राहावी म्हणून पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. शहरातील शाळांच्या बाहेर हिरोगीरी करणारे व अल्पवयीन शालेय दुचाकीचालक यांच्यावर भिगवण पोलिसांनी कारवाई केली आहे. भिगवण पोलिसांनी थोरात हायस्कूल,भैरवनाथ हायस्कूल व क्षिरसागर कॉलेज येथे नाकाबंदी करून विनापरवाना वाहन चालवणे,ट्रिपल सीट मोटरसायकल चालवणे,गाडीची कागदपत्रे जवळ न बाळगणे,त्याचबरोबर अल्पवयीन मुले गाडी चालविताना आढळून आल्याने त्यांच्या पालकांना समक्ष बोलावून यापुढे मुलांच्या ताब्यात गाडी न देणेबाबत समज देऊन,योग्य



ती कायदेशीर कार्यवाही करण्यात आली. यावेळी भिगवण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे यांनी पालकांना आवाहन केले आहे की,यापुढे लहान मुलांच्या ताब्यामध्ये गाडी दिल्यास पालकांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

भिगवण पोलीस ठाण्याकडून करण्यात आलेल्या या कारवाईचे भिगवणकरांनी स्वागत केले असून या कारवाईत सातत्य राहिले पाहिजे.अशी भावना पालकांनी व्यक्त केली आहे.शाळेतील मुख्याध्यापक यांनीही दुचाकीवर येणाऱ्या मुलांच्या पालकांना याबाबत योग्य ती कल्पना देऊन मुलांचे भविष्यात होणारे नुकसान टाळावे.यासाठी पालकसभा घेतल्या जाव्यात जेणेकरून पोलिसांवर असणारा अतिरीक्त ताण कमी होऊन पोलीस ही नव्या दमाने काम करतील.आणि शाळेतील मुलांना शिस्त लागेल.




# दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाची श्रावणी सहल उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित स्थानिक दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालयाची श्रावणी सहल आज शनिवार दि.२४ऑगस्ट २०२४ रोजी हर्षोल्हासात पार पडली.

प्राचार्य श्री.एस.बी.गारडे सर आणि पर्यवेक्षक श्री. एस. एन. व्यास सर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावणी पायी सहलीचे नियोजन करण्यात आले होते.



विद्यालयापासून जवळच असलेल्या कुंभारी परिसरातील श्री.संत गजानन महाराज मंदीर या ठिकाणी ही पायी सहल नेण्यात आली.सहलीच्या यशस्वीतेसाठी सहल प्रमुख श्री. पी.बी.ठाकूर सर, श्री.ए.डी.काकड सर,श्री.पी.के.आंधळे सर यांनी विशेष परिश्रम घेतले.पुजा आणि आरती झाल्यानंतर मंदिर परिसरात विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माध्यमिक विभागातील विद्यार्थी प्रिय शिक्षक श्री.ए.डी.काकड सर यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पोषण आहारही देण्यात आला, निमित्ताने प्राचार्य,पर्यवेक्षक आणि शिक्षक बंधू भगिनी यांच्यासह विद्यार्थ्यांनी वन भोजनाचाही आनंद घेतला.

### पाटोद्यात पुन्हा अतिवृष्टी, उरले सुरले पिके ही झाले नष्ट...

# शंभर टक्के नुकसान गृहीत धरून,सरसकट पिक विमा द्या-शिवभूषण जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोद्यात पुन्हा अतिवृष्टी झाली असून उरले सुरले पिके ही नष्ट झाले आहेत. तरी शंभर टक्के नुकसान गृहीत धरून सरसकट पिक विमा देण्यात यावा अशी मागणी पाटोदा तहसीलदार यांना शनिवार २४ ऑगस्ट-२०२४ रोजी दिलेल्या निवेदनात तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष शिवभूषण जाधव यांनी केली आहे. तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या दिड महिन्यापासून सततच्या पावसामुळे व ढगाळ वातावरणामुळे सूर्यदर्शना अभावी खरीप पिकाची वाढ खुंटलेली होती तसेच या काळातील वातावरण हे किडी व रोगास अनुकूल होते. पर्यायाने अपेक्षित पीक आले नव्हते या मुळे नियमानुसार शेतकरी २५% पिक





विमा अग्रीम रकमेस पात्र ठरत असताना, अग्रीम रक्कम मिळालीच नाही, त्यातच दिनांक-१७ ऑगस्ट-२०२४ ला पाटोदा महसूल मंडळात व पाटोदा तालुक्यातील अनेक गावात अतिवृष्टी झाली. त्या मुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले व त्यातच मांजरा नदीकाठच्या जमिनी खरडून गेल्या व पिकांचे नुकसान झाले. तर या नंतर दिनांक- २३ ऑगस्ट-२०२४ रोजी रात्री पुन्हा अतिवृष्टी झाली. तालुक्यामध्ये कमी जास्त प्रमाणात सगळीकडेच अतिवृष्टी झाली त्या मुळे शेतकऱ्यांचे उरले सुरले पिके ही नष्ट झालेली आहे. त्या मुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे शंभर टक्के नुकसान गृहीत धरून त्यांना पिक विमा देण्यास संबंधित कंपनीस आदेशित करण्यात यावे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904